**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – कुलदीप किशोर पर्बत

माझे वय ३५ वर्षे व्यवसाय पोलीस कॉन्स्टेबल.

राहणार श्रीरामपुर शहर पोलीस ठाणे, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत.**

१. दिनांक ०२.०८.२०२० रोजी मी अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांनी त्यांचे कॅबीनमध्ये बोलावून सांगितले की, गणोरे गावामध्ये आढळा नदीच्या काठावर अवैध वाळुचा उपसा सुरु आहे. तेथे जावून कारवाई करा. त्यानंतर मी, पो.ना.गोराणे, पो.कॉ.वलवे व पो.कॉ.सानप असे मिळून खाजगी वाहनाने संध्याकाळी ०६.०० वाजताचे सुमारास गणोरे येथे आढळा नदीजवळ गेलो. तेथे गेल्यानंतर आम्हाला एका महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.१४–एम.–८१३३ व राखाडी रंगाची ट्रॉली क्रमांक एम.एच.१४–ए.व्ही.–९०१२ दिसून आली. त्या ट्रॉलीमध्ये वाळू भरत असल्याचे दिसले. आम्ही त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी गेलो असता आमचा सुगावा लागल्याने त्या ट्रॅक्टरचा चालक तेथून पळून गेला. आम्ही चौकशी केली असता त्या ट्रॅक्टरचा चालक सत्यवान किसन मोरे, रा.गणोरे हा असल्याचे समजले. त्या ट्रॉलीमध्ये एक ब्रास वाळू आणि तीन फावडे व पाच पाट्या असे साहित्य मिळून आले. आम्ही तो ट्रॅक्टर व ट्रॉली त्यातील वाळू व इतर साहित्य या सह एका खाजगी चालकाच्या मदतीने अकोले पोलीस ठाणे येथे आणले. पो.कॉ.श्री. सानप यांनी घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. तपासिक अंमलदार यांनी

माझे तपास टिपण नोंदविले आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.पोखरकर यांचे मार्फत</u>–**

२. आम्ही अकोले पोलीस ठाणे येथून संध्याकाळी ०५.०० ते ०५.१५ वाजताच्या दरम्यान बाहेर पडलो आणि संध्याकाळी ०६.०० वाजताचे सुमारास गणोरे येथे पोहोचलो. आम्ही गेलो त्या खाजगी वाहनाचा क्रमांक व त्याच्या मालकाचे नाव मला सांगता येणार नाही. आमच्या पथकाचे प्रमुख पो.ना.गोराणे हे होते. गौण खनिजासंदर्भात कारवाई करण्याचे अधिकार महसूल अधिकारी यांना आहेत, याची मला माहिती आहे. आम्ही छाप्याला जाण्यापूर्वी कोणत्याही महसूल अधिका–याला त्याबाबत माहिती दिलेली नाही.

३. आरोपीचे नाव आम्हाला चौकशी अंती समजले. आम्ही ज्या खाजगी चालकामार्फत ट्रॅक्टर व ट्रॉली अकोले पोलीस ठाणे येथे आणले, त्या चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. एक ब्रास म्हणजे किती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या कथित वाळुचे मोजमाप व किंमत आम्ही अंदाजे टाकली आहे. त्या कथित वाळुचे पुढे काय झाले, हे मला माहित नाही. आम्ही त्या ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळुचे फोटो काढलेले नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांनी दिलेल्या सुचनेनुसार आम्ही खाजगी वाहनाने गणोरे येथे गेलो, तेथे आम्हाला ट्रॅक्टर व ट्रॉली दिसली, त्या ट्रॉलीमध्ये वाळू भरण्याचे काम चालू होते, त्या ट्रॅक्टरचा चालक पळून गेला, चौकशीमध्ये त्या ट्रॅक्टर चालकाचे नाव सत्यवान किसन मोरे असे असल्याचे समजले, त्या ट्रॉलीमध्ये एक ब्रास वाळू, तीन फावडे व पाच पाट्या होत्या, आम्ही खाजगी चालकाच्या मदतीने तो ट्रॅक्टर, ट्रॉली व त्यातील वाळू व साहित्य अकोले

पोलीस ठाणे येथे आणले, पो.कॉ.सानप यांनी फिर्याद दिली, माझे तपास टिपण नोंदविले, हे मी खोटे सांगत आहे. तपासिक अंमलदार यांनी माझा जबाब त्याच दिवशी घेतला. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून अवैध वाळूची प्रकरणे दाखविण्यासाठी आम्ही आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.08.12 17:45:32 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – १२.०८.२०२५**